नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ०८/१२/२०२५ (सोमवार )**

---

## ठकवणुक करणाऱ्या पाहीजे आरोपीस केले अटक
## मौदा पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन मौदा :—** पोलीस स्टेशन मौदा येथे दिनांक २२/११/२०२५ रोजी फिर्यादी प्रिती प्रेमदास कुरजेकर ,रा. मौदा, जि. नागपुर यांनी पो.स्टे. ला येवुन तक्रार दिली की, फिर्यादी यांचे घरातील किरायदार नामे संजय भिमराव काठोळे, वय ३५ वर्षे, रा. वरुड, जि. अमरावती यांनी पैसे व सोने डबल करुन देण्याचे आमीष दाखवुन एकुण २,२६,०००/— रुपये ठकवणुक करुन घेवुन गेले आहे. अशा रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मौदा येथे कलम ३१८ भा.न्या.सं अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्हा केल्यानंतर नमुद आरोपी हा पळुन गेला होता.

मा. वरीष्ठ पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनात मौदा पोलीस स्टेशन येथील गुन्हे शोध पथकाने तांत्रिक पुराव्याच्या अधारे दिनांक ०७/१२/२०२५ रोजी **आरोपी संजय भिमराव काठोळे, वय ३५ वर्षे, रा. वरुड, जि. अमरावती** यास उमरेड येथुन ताब्यात घेतले. सदर आरोपीस गुन्हयाबाबत सखोल विचारपुस केली असता त्यांनी सदर गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीकडून गुन्हयातील सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम १५०००/— रूपये असा एकुण १,४१,५००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असुन मा. न्यायालयाने **दिनांक ०९/१२/२०२५ पर्यत पोलीस कोठडी** रिमांड मंजूर केला आहे.



## जनावरांची अवैधरित्या वाहतुक करणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद
## १३ गोवंश जनावरांची सुटका, कुही पोलसांची कामगिरी

पोलीस स्टेशन कुही :— दिनांक ०८/१२/२०२५ रोजी कुही पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, उमरेड कडुन नागपूर हायवेने एका बोलेरो पिकअप क्र. **एम. एच. ४० बि. एल. ८५५४** या वाहनामध्ये अवैधरित्या जनावरांची वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा कळमना शिवार येथील मुकुंदा ढाब्याजवळ नाकाबंदी केली असता नाकाबंदी दरम्यान बोलेरो पिकअप क्र. **एम. एच. ४० बि. एल. ८५५४** येताना दिसले. पोलीसांनी वाहन थांबविण्याचा इशारा केला असता यातील चालकाने पोलीसांना पाहुन दुर अंतरावर वाहन थांबवुन अंधाराचा फायदा घेत पळुन गेला. पोलीसांनी वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये १३ गोवंश जनावरे असे मिळुन आले. नमुद जनावरांना कोणतीही चारापाण्याची सोय न करता, अत्यंत कमी जागेत

दाटीवाटीने कोंबुन, शिंगाला व पायाला आखुड दोरखंडाने बांधुन वाहतुक करीत असल्याचे दिसुन आले. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून **१) बोलेरो पिकअप क्र. एम. एच. ४० बि. एल. ८५५४ किंमती ६,००,०००/—रूपये २) १३ गोवंश जनावरे किंमती १,६०,०००/— रूपये असा एकुण किंमती ७,६०,०००/— रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.**

नुमद प्रकरणी आरोपीविरूध्द कलम ११(१) (ड) (ई) प्रा. छ. अधि. सहकलम ५ (ए) ,९ महा. पशु संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## बालविवाह मुक्त महाराष्ट्र—आपला संकल्प अभियाना अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयातील बाल कल्याण पोलीस अधिकारी यांची घेण्यात आली कार्यशाळा.

दिनांक ०८/१२/२०२५ रोजी पोलीस भवन नागपुर येथे नागपूर ग्रामीण जिल्हा पोलीस आणि महीला व बाल विकास कार्यालयाच्या संयुक्त विद्यमाने **महाराष्ट्र शासनाच्या बालविवाह मुक्त महराष्ट्र — आपला संकल्प अभियाना अंतर्गत बाल विवाह प्रतिबंध कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.** या कार्यशाळेत नागपुर ग्रामीण जिल्हयात २१ पोलीस स्टेशन येथील बालकल्याण पोलीस अधिकारी, तसेच पोलीस काका/ दिदी चे कामकाज करणारे पोलीस अंमलदार उपस्थित होते. नमुद कार्यशाळेत बाल विवाह प्रतिबंध अधिनियम २००६ चे मुख्य कलम, उल्लंघन कर्त्यांवर होणारी शिक्षा , बाल विवाह रोखण्यासाठी तात्काळ कारवाई पद्धती आणि चाइल्ड हेल्पलाइन १०९८ चा वापर याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. बाल विवाह मुक्त महाराष्ट्र — आपला संकल्प अभियान' अंतर्गत १५ ऑक्टोबर २०२५ ते २६ जानेवारी २०२६ रोजी पर्यत जनजागृती मोहीम राबवली जाणार आहे.

सदर कार्यशाळेत श्री सुनिल मेसरे, महीला व बाल विकास अधिकारी, जिल्हा परीषद नागपुर, श्रीमती छाया राउत, अध्यक्षा बाल कल्याण समिती नागपुर, श्री मुश्ताक पठाण, जिल्हा व बाल संरक्षण अधिकारी, नागपुर, पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र पाटील, पोलीस उपधिक्षक ( गृह ) आणि सहा. पोलीस निरीक्षक श्रीमती माधुरी गायकवाड, प्रभारी अधिकारी भरोसा सेल, नागपुर ग्रमीण यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. सर्वांनी **बालविवाह मुक्त महराष्ट्र निर्माण करण्याची शपथ घेतली.**

नागपुर ग्रामीण जिल्हा पोलीसांतर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, बाल विवाहाची माहिती तात्काळ जवळच्या पोलीस स्टेशनला किंवा पोलीस पाटील यांना किंवा ११२, १०९८ हेल्पलाईन कमांकावर द्यावी .





# नरखेड पोलीसांनी हरविलेल्या दोन मुलांची आणि आईवडीलांची अवघ्या दोन तासात घडवुन आणली भेट

नरखेड पोलीस स्टेशन हद्दीतील बेलोना गावात सुरु असलेल्या रथ यात्रेमध्ये दिनांक ०७/१२/२०२५ रोजी एक मुलगा व त्याची लहान बहीन हे हरविलेल्या स्थीतीत मिळुन आल्याबाबत पोलीस पाटील बेलोना यांचे कडुन माहीती मिळाल्यावरून तात्काळ नरखेड पोलीसांनी घटनास्थळी पोहचुन सदर मुलगा आणि त्याच्या बहीनीकडे त्याचे आई वडील व इतर नातेवाईकाबाबत विचारपुस करुन त्याचे नाव गाव विचारले असता मुलगा नामे हनीस जावेद शहा, वय १० वर्ष, आणि त्याची बहीण नामे नजीलिया जावेद शहा, वय ०७ वर्ष, दोन्ही रा. लालखडी, रेल्वे गेट चे बाजुला, अमरावती असे सांगीतल्याने त्यांचे नातेवाईकांचा व आई वडीलांचा बेलोना व नरखेड येथे शोध घेतला असता अवध्या दोन तासामध्ये त्याचे वडील नामे जावेद सलीम शहा वय ४० वर्ष हे रेल्वे स्टेशन नरखेड येथे मिळुन आल्याने मुलांना पालकांच्या ताब्यात देण्यात आले. सदर वेळी पालकांनी नरखेड पोलीसांचे आभार व्यक्त केले.




## कळमेश्वर खुनाच्या प्रयत्न प्रकरणात अग्निशस्त्र पुरवणारा अजुन एक आरोपी ताब्यात

**पोलीस स्टेशन कळमेश्वर**:— बाल्या हिरामण गुजर, रा. बिरसा नगर,कुही फाटा ता उमरेड याला दिनांक २३/११/२०२५ रोजी दुपारी शंकरपट गावात आरोपी नामे देवा उर्फ परमेश्वर पिसाराम एकनाथ, रा. वार्ड क्र २ सेलु, ता कळमेश्वर, जि. नागपुर तसेच त्याचे साथीदांर यांनी जुन्या वादाच्या कारणावरून त्याला अग्निश़स्त्राने गोळी झाडुन जिवे मारण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे कलम १०९, ११८(१), १८९(२), १९१(२), १९१(३),१९० भा.न्या.सं सहकलम ३,४/२५ आर्म अॅक्ट अन्वये गुन्हा नोंद आहे.

सदर प्रकरणी पोलीसांनी दिनांक २३/११/२०२५ रोजी १)परमेश्वर उर्फे देवा पिसाराम एकनाथ, २) काशिराम बापुराव एकनाथ,३) सावनाथ उर्फे सावन काशिनाथ एकनाथ ४) चंद्रशेखर उर्फे राहीन प्रेमलाल एकनाथ,५)प्रेमलाल बोहुरजी एकनाथ ६) तपन पिसाराम एकनाथ ७)आकाश पिसाराम एकनाथ ८) मोरेश्वर पिसाराम एकनाथ सर्व रा. सेलु, ९) रोशन रतन एकनाथ १०) दिनेश ईश्वर सनेश्वर, **यांचा तात्काळ शोध घेवुन ताब्यात घेतले**

**नमुद आरोपीतांची चौकशी केली असता आरोपी चंद्रशेखर उर्फे राहीन प्रेमलाल एकनाथ याने सदर अग्निशस्त्र (देशी माउजर) आरोपी क्रं ११) अमृतसिंग तुफानसिंग भादा, वय २२ वर्षे, रा. वार्ड क्र १५ सरदार मोहल्ला कळमेश्वर याचे कडुन विकत घेवुन आरोपी नामे देवा उर्फ परमेश्वर पिसाराम एकनाथ याला दिल्याची माहीती प्राप्त झाल्यामुळे आरोपी क्रं. आरोपी क्रं ११) अमृतसिंग तुफानसिंग भादा याला अटक करण्यात आली होती. अटकेत असतांना त्याने पोलीसांना माहीती दिली की, सदर अग्निशस्त्र आरोपी क्रं १२) जसपालसिंग चरतसिंग बावरी, वय २५ वर्षे,रा. वार्ड क्रं ६ गुरूनानक नगर, तळेगाव, ता. आष्टी, जि वर्धा याचे मार्फतीने पाचोरी जि बुऱ्हानपुर राज्य मध्यप्रदेश येथुन आणल्याचे सांगितले होते. स्थानिक गुन्हे शाखे पथक नमुद आरोपीच्या शोधात असतांना दिनांक ०८/१२/२०२५ रोजी तांत्रिक पुरावे आणि गुप्त बातमीदार यांच्या मार्फतीने शोध घेवुन आरोपी क्रं आरोपी क्रं १२) जसपालसिंग चरतसिंग बावरी, वय २५ वर्षे,रा. वार्ड क्रं ६ गुरूनानक नगर, तळेगाव, ता. आष्टी जि वर्धा याला तळेगाव — आर्वी रोड येथुन ताब्यात घेतले आहे.**

## कोंबडयांची झुंज लावुन जुगार खेळणाऱ्यांवर गुन्हा नोंद.

**पोलीस स्टेशन कन्हान** :— दिनांक ०७/१२/२०२५ रोजी कन्हान पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की भारत पेट्रोलपंपचे मागे विठ्ठल कनोजे याचें घराचे बाजुला कान्द्री कन्हान येथे कोंबडयाची झुंज लावून पैशांचा हारजितचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे कन्हान पोलीस घटनस्थळी पोहचले असता, भारत पेट्रोलपंपचे मागे विठ्ठल कनोजे याचें घराचे बाजुला कान्द्री, कन्हान येथे काही इसम कोंबडयांच्या पायाला धारदार काती बांधुन त्यांची झुंज लावुन पैशांचा हारजितचा खेळ खेळतांना दिसुन आले. पोलीसांना पाहुन काही इसम पळुन गेले. **आरोपी क्र. १) नरेन्द्र केसरीप्रसाद दुबे, वय ४२ वर्ष, रा. देशपांडे लेआउट त्रिमुर्ती नगर नागपूर २) अनिकेत अशोक मेश्राम, वय २७ वर्ष, रा. नागसेननगर कामठी ३) सचिन हरीभाउ दुधपचारे, वय ३० वर्ष, रा. सर्वोश्री नगर उमरेड रोड दिघोरी नागपूर यांना पोलीसांनी शिताफिने पकडले.** आरोपीच्या ताब्यातून एकुण नगदी १२३०/—रूपये व लोखंडी काती किंमती ५०/—रूपये तसेच जख्मी लाल रंगाचा कोंबडा लीलाव करण्यात आला किंमती ३००/—/—रूपये असा

एकुण १५८०/— रूपयांचा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त केला आहे. नमुद आरोपी यांच्यावर पोलीस स्टेशन कन्हानला १२ (ब) म. जु. का. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

## अवैधरित्या विनापरवाना मोहाफुल गावठी दारूची वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पोलीस स्टेशन कुही** :— दिनांक ०७/१२/२०२५ रोजी कुही पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, होंडा ॲक्टीवा या वाहनाने **अवैधरीत्या मोहाफुल गावठी दारूची वाहतुक केली** जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा कळमना शिवार नाकाबंदी केली असता होंडा ॲक्टीवा क्र. एम एच ४० बी.ए. ८२५२ ही मिळुन आली. वाहन थांबवुन वाहनाची पंचासमक्ष पाहणी केली असता त्यात मोहाफुल दारू मिळुन आली. **आरोपी नामे रोशन अशोक खोब्रागडे, वय ३८ वर्ष, रा. चांपा वस्ती, त. उमरेड** हा अवैधरीत्या मोहाफुल दारूची वाहतुक करतांना मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष १) होंडा ॲक्टीवा क्र. एमएच ४० बी.ए. ८२५२ किंमती ५००००/—रू. २) ८० लिटर मोहाफुल गावठी दारू प्रति लिटर ५०/— प्रमाणे ४००० असा **एकुण ५४,०००/— रुपयांचा** मुददेमाल जप्त केला आहे.

**नमुद आरोपी विरूध्द पोलीस स्टेशन कुही येथे कलम महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## उमरेड शहरातील वाहतुक कोंडीवर पोलीसांनी केलेल्या उपाययोजना

दिनांक ०६/१२/२०२५ चे एका वृत्तपत्रात उभ्या ट्रक्समुळे उमरेडमध्ये वाहतुक कोंडी अशा शिर्षकाखाली बातमी प्रसीध्दी झाली आहे. सदर प्रकरणाची सविस्तर माहिती अशी आहे की, उमरेड पोलीस सदर ठिकाणी सतत कारवाई करत असुन कलम २८५ भान्यासं ( सार्वजनिक मार्गावर अडथळा निर्माण करणे ) तसेच कलम १२२ मोटर वाहन कायदा ( नो पार्किंग ) अन्वये सतत कारवाई करत आहे. तसेच गोडाउन मालकांना वर्दळीच्या वेळेत मालाची चढ—उतार करू नये याबाबत सुचना देण्यात आल्या. तसेच त्या ठिकाणी वाहतुक पोलीसांची गस्त नेमण्यात आली आहे.

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणारे तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०७ गुन्हे नोंद

दिनांक ०७/१२/२०२५ दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू काढणारे तसेच दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू तसेच वाहन असा एकुण ५७,६४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलीस स्टेशन कुही येथे एकुण १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन सावनेर येथे एकुण २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन अरोली येथे एकुण २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन काटोल येथे २ गुन्हे नोंद आहे. महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण ०७ गुन्हे नोंद केले आहे.

**सदर कारवाईत ५९४० मिली देशी दारू, १०० लीटर मोहाफुल दारू, तसेच वाहनासह असा एकुण ५७,६४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचानामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने